दैनिक

बीड महाराष्ट्र | शुक्रवार , 5 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 116 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# बीड जिल्हा युवा महोत्सवाचे दिमाखात उद्घाटन !

## "युवक महोत्सव हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन" : कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी;

**सिरसाळा : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, शिरसाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ४ आणि ५ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित दोन दिवसीय बीड जिल्हा युवा महोत्सवाचा अत्यंत उत्साही आणि दिमाखदार वातावरणात प्रारंभ झाला. या महोत्सवाचे भव्य उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते संपन्न झाले.या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रामेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, सोनपेठचे अध्यक्ष माननीय श्री. व्यंकटरावजी कदम हे उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव मा. योगेशभैय्या कदम, शिरसाळ्याचे सरपंच नशीब भाई, विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. दत्ता भांगे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभोरे, नंदकुमार सारडा, श्री. बापूराव भुसारे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. ए. व्ही. जाधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी म्हणाले, "युवक महोत्सव हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना, नेतृत्वाला वाव देणारे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे." पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रातील संशोधनाला गती देण्यासाठी विद्यापीठाने जिल्हा पातळीवर 'अविष्कार संशोधन महोत्सवाचे' आयोजन केले असून, त्यात मुलींचा सहभाग वाढणे ही काळाची गरज आहे. तरुणांमधील अफाट क्षमतेचा योग्य वापर होणे गरजेचे असून, सोशल मीडिया हे विकासाचे साधन म्हणून वापरण्याचे आवाहन त्यांनी केले. संवाद क्षमता, कला आणि वक्तृत्व या गुणांमध्ये नैपुण्य मिळवल्यास विद्यार्थ्यांना प्रत्येक क्षेत्रात आपोआप यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### ७२ महाविद्यालयांची नोंदणी; मुलींचा टक्का अधिक!

विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. कैलास अंभोरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, खेड्यातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने या महोत्सवाचे जिल्हा स्तरावर आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील तब्बल ७२ महाविद्यालयांनी नोंदणी केली असून, २५० मुले आणि ३१६ मुली अशा एकूण ५६६ स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे. यात ५७% विद्यार्थिनींचा सहभाग असणे ही अत्यंत भूषणावह आणि आनंदाची बाब आहे. आज मुले आणि मुली खांद्याला खांदा लावून सामाजिक प्रश्नांवर कलाविष्कार सादर करत आहेत, याबद्दल त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मा. योगेशभैय्या कदम यांनी कुलगुरूंचे आभार मानले आणि सर्व स्पर्धकांना उत्कृष्ट सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. ए. व्ही. जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सी. बी. कणसे यांनी केले.

### सांस्कृतिक व्यासपीठांवरील विविध कलाविष्कारांची धूम

: महोत्सवाच्या पहिल्या दिवशी भव्य आणि आकर्षक 'शोभा यात्रेने' सर्वांचे लक्ष वेधून घेतले. एकूण आठ महाविद्यालयांनी विविध सामाजिक व सांस्कृतिक विषयांवर आधारित सुंदर प्रदर्शन या शोभायात्रेत केले. त्यानंतर विविध स्टेजवर स्पर्धांना सुरुवात झाली:





### वादविवाद स्पर्धा

■ निसर्गचक्र व तंत्रज्ञानावर ५७ विद्यार्थ्यांचे मंथन स्टेज क्रमांक दोनवर 'निसर्गचक्र व तंत्रज्ञान यामुळे मानवी भविष्य संकटात आले आहे/नाही' या संवेदनशील विषयावर वादविवाद स्पर्धा रंगली. यात ५७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.नकारात्मक बाजू मांडताना विद्यार्थ्यांनी जागतिक तापमानवाढ, ऋतूचक्रातील बदल, वाढते प्रदूषण, मानवी आरोग्यावरील ताण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (AI) निर्माण होणारी बेरोजगारी या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. सकारात्मक बाजू मांडताना सौर व पवन ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, उपग्रहाद्वारे आपत्ती व्यवस्थापन, वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानामुळे मिळणारी अन्नसुरक्षा या मुद्द्यांच्या आधारे तंत्रज्ञान मानवाचे भविष्य सुरक्षित करत असल्याचे पटवून दिले. दोन्ही बाजूंनी झालेल्या जोरदार युक्तिवादाने ही स्पर्धा अत्यंत रंगतदार ठरली.

### मूक अभिनय :

■ १९ महाविद्यालयांकडून सामाजिक प्रश्नांवर प्रहार (स्टेज १ - मुख्य स्टेज) मुख्य स्टेजवर १९ महाविद्यालयांच्या संघानी आपल्या कसदार मूक अभिनयातून समाजातील ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली. यामध्ये सर्वधर्मसमभाव, 'प्रॉपर्टी पास ज्ञान नापास', आधुनिक विरूद्ध पारंपारिक संगीत, राजकीय सत्तांतरण, पर्यावरण ऱ्हास, स्त्री अत्याचार, दहशतवाद आणि सैनिकांचे खडतर जीवन अशा विविध संवेदनशील विषयांवर मूकनाट्य सादर करण्यात आले. कलाकारांच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे काम केले

### शास्त्रीय गायन

■ विविध रागांच्या सादरीकरणाने श्रोते मंत्रमुग्ध (स्टेज ३)स्टेज क्रमांक तीनवर सकाळी ११ ते २ या वेळेत भारतीय शास्त्रीय गायन स्पर्धा पार पडली. यात १३ संगीत साधकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धकांनी पुरिया धनश्री, यमन, केदार, बिलावल, काफी, भैरव या रागांचे आणि 'बड्या ख्याल'चे अत्यंत बहारदार सादरीकरण करून संपूर्ण परिसर संगीतमय केला. त्यांच्या या सुरेल सादरीकरणाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

### एकांकिका:

■ कौटुंबिक मूल्ये आणि सामाजिक जाणिवांचे दर्शन (स्टेज १ - मुख्य स्टेज) मुख्य स्टेजवर सादर झालेल्या चार एकांकिकांनी प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. 'सामना' एकांकिका: स्वा. रा. ती. महाविद्यालय, अंबाजोगाईच्या नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सतीश आळेकर लिखित 'सामना' ही एकांकिका सादर केली. दोन वृद्धांच्या जीवनप्रवासावर आधारित या प्रयोगाने वृद्धाश्रमाची भीषण वास्तवता मांडत प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आणले. 'शहाणपण' एकांकिका: नवरा-बायकोतील विश्वास, बाप-लेकाचे नाते आणि व्यसनाधिनतेमुळे उद्ध्वस्त होणारे कुटुंब यावर प्रकाश टाकणाऱ्या या एकांकिकेला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. या प्रबोधनात्मक कलाकृतीने कौटुंबिक ऐक्याचा संदेश दिला.याशिवाय 'प्रतिबिंब' आणि 'कर्जाचा फास' या अत्यंत भावनिक आणि सामाजिक आशय असलेल्या एकांकिकांनी महोत्सवाच्या पहिल्या दिवशी आपला गडद ठसा उमटवला.युवक महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शिरसाळा परिसरातील नागरिक, रसिक प्रेक्षक आणि जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# प्रशासकीय शिस्त आणि विकासाची दूरदृष्टी : वरिष्ठ IAS अधिकारी श्री . किरण गित्ते साहेब

भारतीय प्रशासकीय सेवेतील २००५ च्या बॅचचे वरिष्ठ IAS अधिकारी श्री. किरण गित्ते साहेब यांनी त्रिपुरा, महाराष्ट्र आणि राष्ट्रीय स्तरावर विविध महत्त्वाच्या पदांवर जबाबदारी पार पाडली आहे. त्रिपुरा राज्यात धलाई व आगरतळाचे जिल्हाधिकारी, आगरतळा महानगरपालिकेचे आयुक्त आणि पर्यटन, सार्वजनिक बांधकाम, नगर विकास, आरोग्य, ऊर्जा व उद्योग अशा विविध विभागांचे सचिव म्हणून काम करताना त्यांनी दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांना 'वन अधिकार कायद्यांतर्गत' जमिनीचे हक्क मिळवून दिले, उजयंता राजमहल, डुंबूर सरोवर, छबीमुरा, नीरमहल व त्रिपुरा सुंदरी मंदिरासारख्या प्रमुख पर्यटन स्थळांचा विकास केला, आगरतळा विमानतळ विस्तार व स्मार्ट सिटी उपक्रम मार्गी लावले, तसेच त्यांनी राबवलेल्या १००% बँक खाते योजनेच्या धर्तीवर पुढे 'प्रधानमंत्री जन धन योजना' आखण्यात आली असून यासाठी त्यांना २०१५ मध्ये पंतप्रधान प्रशासकीय उत्कृष्टता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



महाराष्ट्रात अमरावतीचे जिल्हाधिकारी असताना त्यांनी सुरू केलेली पांदन रस्ते योजना पुढे राज्य शासनाने 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना' म्हणून लागू केली व जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवल्याबद्दल त्यांना २०१६ मध्ये 'सर्वोत्कृष्ट जिल्हाधिकारी' पुरस्कार मिळाला, तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) आयुक्त म्हणून हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो व पुणे रिंग रोडच्या कामांना गती दिली. राष्ट्रीय स्तरावर 'स्वच्छ भारत अभियान' व 'शहरी आवास योजना' यशस्वी केल्याबद्दल २०२२ मध्ये राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या गित्ते साहेबांनी २०२३ च्या त्रिपुरा निवडणुकीत मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ९० टक्क्यांहून अधिक शांततापूर्ण मतदान घडवून आणले. त्रिपुरा प्रशासनात ई-गव्हर्नन्स व डिजिटल कामाला प्रोत्साहन देणाऱ्या आणि ३२ लाखांहून अधिक नागरिकांचे 'आभा आयडी' तयार करून आरोग्य यंत्रणेचे डिजिटलायझेशन करणाऱ्या गित्ते साहेबांकडे सध्या त्रिपुराच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव, सार्वजनिक बांधकाम, उद्योग व आरोग्य विभागाचे सचिव आणि 'त्रिपुरा इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी ही जबाबदारी असून त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती उषाताई गित्ते परळी वैजनाथ परिसरात 'विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी'च्या माध्यमातून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत; अशा या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला ५ सप्टेंबर रोजी वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्याच्या हार्दिक
■ शुभेच्छा! - शुभेच्छुक: महेश मुंडे



# संपादकीय

## एका भाषायोगिनीचे प्रयाण

'मूर्तिमंत मराठीप्रेम' या दोन शब्दांत ज्यांचे यथार्थ वर्णन करता येईल त्या प्रा. यास्मिन शेख यांनी सोमवार, २४ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता वयाच्या एकशेएकाव्या वर्षी शेवटचा श्वास घेतला. भाषेबद्दलची कुठलीही शंका जिला कधीही निःसंकोच विचारता येईल अशी एक हक्काची व्यक्ती आता आपल्यात उरलेली नाही या जाणिवेतून एक रितेपण मनात दाटून आले.

त्या जन्माने ज्यू. नाव जेरुशा रूबेन. तिला लहानपणापासून वाचनाची प्रचंड आवड. खांडेकर, फडके, माडखोलकर, नाथमाधव यांची पुस्तके; 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर', 'सत्यकथा' अशी मासिके आणि 'नवयुग', 'चित्रा', 'मौज', 'झंकार' अशी साप्ताहिके वाचनालयातून मिळत. 'झंकार'मध्ये 'उपेक्षितांचे अंतरंग' या शीर्षकाखाली प्रा. श्री. म. माटे यांच्या कथा प्रसिद्ध होत होत्या. त्या कथांतून माटे यांची दलितांविषयीची नितांत पोटतिडीक, अनुभवांचा सच्चेपणा आणि भाषाशैली यांचा जेरुशाच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. भाषेची गोडी मनात रुजली. अनेक लेखक वाचनप्रेमातून लेखनाकडे वळल्याचे आपल्याला ठाऊक आहे. जेरुशाच्या बाबतीत वाचनप्रेमातून भाषाप्रेम असा प्रवास झाला.

तसे रुबेन यांनी घर नाशिकला बांधले होते, पण उच्चशिक्षणासाठी कुटुंब पुण्यात मुक्कामाला होते. जेरुशाने पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि त्याचवेळी 'मराठी कॉम्पोझिशन' हा ऐच्छिक विषय घ्यायचा निश्चय केला. मराठी भाषेविषयी वाटणारे अपरंपार प्रेम हे एक कारण होतेच; पण 'उपेक्षितांचे अंतरंग' लिहिणारे माटे मराठी विषय शिकवणार हेही एक महत्त्वाचे कारण होते. माटे यांनी तिला आपली मुलगीच मानले होते.

१९४६ साली जेरुशा बीए झाली; केवळ मराठीतच नव्हे, तर सर्वच विषयांच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून. प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांनी तिला एमएसाठी फेलोशिपही दिली; पण त्या काळात काही आजारपणामुळे तिला नाशिकला जावे लागले. त्यावेळी एमएसाठी पुस्तके कुठे मिळतील ह्याची चौकशी करण्यासाठी वडिलांबरोबर ती सुप्रसिद्ध नाटककार प्रा. वसंत कानेटकर ह्यांच्या निवासस्थानी गेली. मुसळधार पावसात चिंब भिजलेल्या अवस्थेत! कानेटकरांना तिचे अतिशय कौतुक वाटले. त्यांनी आवश्यक ती पुस्तके तर मिळवून दिलीच, पण शिवाय जेरुशाची व अझीज शेख ह्या तेथील चित्रमंदिरात मॅनेजर असलेल्या एका देखण्या, उमद्या, मुस्लिम तरुणाची ओळख करून दिली. कानेटकर ह्यांच्याच पुढाकाराने पुढे १९५० साली दोघांचे लग्न झाले, मिस जेरुशा रुबेन मिसेस यास्मिन शेख बनल्या; त्यांनी धर्म मात्र कधीच बदलला नाही.

एमए झाल्यानंतर शेखबाईंनी औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयात दोन वर्षे अध्यापन केले. नंतर मुंबईला शीव येथील एस.आय.इ.एस. महाविद्यालयात त्यांनी २७ वर्षे अध्यापन केले. इथेच विंदा करंदीकर इंग्रजी व चंद्रकांत बांदिवडेकर हिंदी शिकवत. श्री. पु. भागवत मराठीचे विभागप्रमुख होते; शेवटची सात वर्षे शेखबाई विभागप्रमुख होत्या. निवृत्तीनंतर दहा वर्षे त्या यू.पी.एस.सी.च्या परीक्षार्थींना मराठी शिकवत. एकूण ४४ वर्षे त्यांनी मराठीचे अध्यापन केले. पाठाची पूर्वतयारी केल्याशिवाय, टिपणे काढल्याशिवाय त्या कधीही वर्गावर गेल्या नाहीत. व्याकरणासारखा क्लिष्ट विषयही अगदी सोप्या शब्दांत समजावून सांगण्याची त्यांची हातोटी. त्यामुळेच एक विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती आणि अनेक माजी विद्यार्थी त्यांच्या कायम संपर्कात असत. व्याकरणाचे शासनमान्य नियम सोप्या भाषेत समजावून सांगणारे पुस्तक लिहावे अशी सूचना राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सरोजिनी वैद्य यांनी शेखबाईंना केली. त्यातून 'मराठी लेखन मार्गदर्शिका' हे त्यांचे पुस्तक आकाराला आले. ते पुस्तक आणि नंतरचा 'मराठी शब्दलेखनकोश' ही शेखबाईंची दोन्ही पुस्तके अभ्यासकांना खूप उपयुक्त ठरली आहेत.

निवृत्तीनंतर १९९६ साली शेख जोडपे पुण्यात औंध येथे स्थायिक झाले. आमच्या घराजवळच. त्यामुळे गाठीभेटीही अधिक सुलभ झाल्या. त्यांची धाकटी मुलगी मुंबईच्या शाळेत असताना माझ्याच वर्गात होती. 'अंतर्नाद' मासिकाच्या व्याकरण सल्लागार म्हणून त्यांचे मोलाचे सहकार्य मिळत गेले, हे मी माझे भाग्य समजतो. 'अंतर्नाद'च्या प्रत्येक अंकाची मुद्रिते त्या अगदी वेळेत तपासून देत. यजमान हृदयविकाराने रुग्णालयात अतिदक्षता कक्षात असतानाही त्यांनी 'अंतर्नाद'ची मुद्रिते तिथेच बसून तपासून दिली होती. यात आपण काही विशेष करतो असेही त्यांनी कधी मला जाणवू दिले नाही. 'अंकात एखादी चूक आढळली तर मला हातावर ओरखडा उमटल्यासारखं वाटतं', असे त्या एकदा म्हणाल्या होत्या. हाती घेतलेले काम जास्तीत जास्त चांगले करणे हीच त्यामागची भावना होती. भाषा हा आपला सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा आहे असे त्या मानत. भाषेच्या संदर्भात त्यांची काही आग्रही मते होती. उदाहरणार्थ, प्रमाणभाषेचा आग्रह. आजकाल वेगवेगळे समाजघटक आपापल्या बोलीचा आग्रह धरत असतात. शेखबाईंचा कुठल्याच बोलीभाषेला विरोध असा नव्हता. ललित साहित्यात वातावरणनिर्मितीसाठी बोलीभाषा आवश्यक असते, पण वैचारिक लेखनात मात्र प्रमाणभाषाच हवी, असे त्या म्हणत. नाहीतर झाडबोलीत केलेले लेखन कोकणातील वाचकाला कसे कळणार किंवा मालवणीत केलेले लेखन चंद्रपूरातील वाचकाला कसे समजेल? साधारण आशय संदर्भाने कळेलही, पण त्या आकलनात नेमकेपणा कसा येणार? महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत आणि प्रत्येकाने स्वतःच्याच बोलीभाषेत लेखन केले तर अनागोंदी माजेल, असे त्यांचे मत होते.



# उमेदच्या ग्राम सखींना दरमहा 15 तर प्रभाग संघ केडरला 24 हजार मानधन द्यावे

## विविध मागण्यांसाठी सर्व ऑनलाईन कामांवर बहिष्कार, गटविकास अधिकाऱ्यांना दिले निवेदन

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत काम करणाऱ्या ग्राम सखींना दरमहा 15 तर प्रभाग संघ केडरला 24 हजार मानधन द्यावे यासह विविध प्रलंबित मागण्या पूर्ण होईपर्यंत ऑनलाईन काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आपल्या मागण्यांचे निवेदन निवेदन आज येथील सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांना दिले आहे.

आपल्या विविध मागण्यांसाठी आज उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुक्यात 160 ग्राम सखी तर 4 प्रभाग केडर कार्यरत आहेत. यासंबंधी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नत अभियानांतर्गत ग्रामीण भागात गावपातळीवर ग्राम सखी म्हणून प्रामाणीकपणे व जबाबदारीने काम करीत आहेत. ग्रामीण भागातील महिला बचत गट ग्रामसंघ, महिला संघटनांना मार्गदर्शन करणे विविध शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे, बचत गटांचे कामकाज व अभियानाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करणे यासाठी सातत्याने कार्य करीत आहेत. मात्र सातत्याने वाढत जाणारा कामाचा ताण, आनलाइन कामकाजाची अतिरिक्त जबाबदारी, मानधन / मोबदला व इतर प्रलंबित प्रश्न यामुळे ग्रामसखी म्हणून काम करणाऱ्या महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उमेदच्या ग्राम सखींना दरमहा 15 तर प्रभाग संघ केडरला 24 हजार मानधन द्यावे, मानधनात दिरंगाई न करता DBT द्वारे नियमित खात्यात दरमहा मानधन आदा करावे. ग्राम सखींना 10,00000/- विमा कवच देऊन मरण पावलेल्या ग्रामसखींना ते तात्काळ देण्यात यावे, ग्रामसखींना कायम स्वरुपी प्रवास भत्ता व आहार भत्ता देण्यात यावा, उमेद अभियानाचे कामे ही डिजिटल व ऑनलाईन असल्याने अभियानांतर्गत सर्व ग्रामसखी यांना डिजिटल टॅब (दर्जेदार) कंपनीचा उपलब्ध करुन देणे व दरमहा मोबाइल डेटा भत्ता देणे आधी मागण्यांचे निवेदन आज पंचायत समिती कार्यालयात जाऊन सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांच्याकडे सादर केले. यावेळी मीरा जिवराज सातभाई, वंदना प्रभाकर उजगरे, इंदुमती वामन कांदे, शितल शिवाजी कोकाटे, वर्षा सुरेश खराटे आदींसह बहुसंख्य ग्राम सखी आणि संघ केडर सहभागी झाले होते.



# मराठवाड्यातील बळीराजा वाऱ्यावर ; आमदार, खासदार अन् प्रशासनाची कुंभकर्णी झोप कधी उघडणार?

■ **परळी प्रतिनिधी**

परळी मतदारसंघ आणि संपूर्ण बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी आज अत्यंत भीषण संकटाचा सामना करत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे डोळ्यादेखत संपूर्ण सोयाबीन जळून खाक झाले आहे. वर्षभर शेतात घाम गाळून, कर्ज काढून उभे केलेले पीक मातीमोल झाले आहे. ही परिस्थिती इतकी विदारक आहे की, हताश झालेल्या शेतकऱ्याला आता आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरलेला दिसत नाही. परंतु, इतकी गंभीर परिस्थिती असतानाही स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मात्र सुस्त आणि ढिम्म बसून आहे.

परळी मतदारसंघाचे आमदार आणि बीड जिल्ह्याचे खासदार केवळ निवडणुकीपुरतेच जनतेचे कैवारी बनतात का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. शेतकऱ्यांच्या घरात अंधार दाटला असताना, लोकप्रतिनिधींनी सभागृहात आणि शासनाकडे या व्यथा ताकदीने मांडणे गरजेचे होते. परंतु, शेतकऱ्यांची ही आर्त हाक त्यांच्या कानठळ्या बसवू शकलेली नाही. लोकप्रतिनिधींची ही उदासीनता बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे.



दुसरीकडे, जमिनीवर काम करणारे तहसीलदार आणि कृषी सहाय्यक यांच्या कारभाराचा तर अंतच झाला आहे. शेतकरी शेताच्या बांधावर डोळ्यात पाणी आणून अधिकाऱ्यांची वाट पाहत आहे, पण कृषी सहाय्यक आणि महसूल विभागाला अजूनही पंचनामे करण्यासाठी वेळ मिळालेला नाही. केवळ एसी केबिनमध्ये बसून आणि कागदी अहवाल बनवून शेतकऱ्यांचे अश्रू पुसता येत नाहीत. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे शेतकरी हवालदिल झाला असून, त्यांना मिळणारा विमा आणि सरकारी मदत लटकली आहे. शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे हे केवळ एका कुटुंबाचे नुकसान नाही, तर हे लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेचे सर्वात मोठे अपयश आहे. शेतकऱ्याला आज भाषणांची किंवा आश्वासनांची गरज नाही, तर त्याला तातडीने आर्थिक आधाराची गरज आहे.प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना तातडीने जागे करण्यासाठी काही प्रमुख मागण्या: परळी आणि बीड जिल्ह्यातील जळालेल्या पिकांचे कृषी सहाय्यक आणि तहसीलदारांनी २४ तासांच्या आत सरसकट पंचनामे सुरू करावेत. आमदारांनी आणि खासदारांनी तात्काळ शासनावर दबाव आणून बीड जिल्ह्यासाठी विशेष आर्थिक पॅकेज मंजूर करून घ्यावे. शेतकऱ्याला आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्यापासून रोखण्यासाठी तात्काळ प्राथमिक स्वरूपाची आर्थिक मदत थेट बँक खात्यात जमा करावी. पीक विमा कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावून १०० टक्के विमा मंजूर करावा.

आता वेळ निघून चालली आहे. जर लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची ही झोप अशीच कायम राहिली, तर बीड जिल्ह्यातील शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. अधिकाऱ्यांनी आणि नेत्यांनी एसी गाड्यांमधून बाहेर पडून शेतकऱ्यांच्या जळालेल्या पिकांची पाहणी करावी, अन्यथा जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही.

■ **दिनेश जयचंद आंधळे**

# श्री .क्षेत्र कपिलधार येथील ३५ दिवशीय अखंड शिवनाम सप्ताह, ज्ञानयज्ञ महोत्सव व परमरस्य पारायण सोहळा उत्साहात संपन्न

■ **परळी वैजनाथ प्रतिनिधी**

श्री.क्षेत्र कपिलधार येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ३५ दिवशीय अखंड शिवनाम सप्ताह, ज्ञानयज्ञ महोत्सव व परमरस्य पारायण सोहळ्याचे आयोजन २९ जुलै गुरुपौर्णिमा बुधवार ते बुधवार (दि.०२) सप्टेंबर पर्यंत करण्यात आले होते या सोहळ्यास भाविक भक्तांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

दिवंगत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या प्रेरणेने व श्री.सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डा यांच्या मार्गदर्शनाने लिंगायत समाजाचे आराध्य दैवत असलेल्या श्री. क्षेत्र कपिलधार येथे गाढे पिंपळगाव येथील दिवंगत सोनाप्पा फुटके, अन्नपूर्णा फुटके या दाम्पत्यांनी या चातुर्मास ३५ दिवशीय सप्ताहाची सुरुवात केली होती. गेल्या ५२ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या या सप्ताहाचे अखंडपणे हे ५३ वे वर्षे होते. २९ जुलै गुरुपौर्णिमेला श्री.विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते कलशपुजन करुन चातुर्मास सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. या सप्ताहात पहाटे शिवपाठ, मन्मस्वामी यांची महापूजा, रुद्रपठण, गाथा भजन, प्रवचन, किर्तन, शिवजागर, महाप्रसाद आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरम्यान ३५ दिवस विविध मान्यवर महाराजांच्या किर्तनांचे त्याचबरोबर रोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी बुधवारी (ता.०२) गुरुलिंग फुटके महाराज यांचे टाळ आरती किर्तन संपन्न झाले. संध्याकाळी दिपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी श्री.मन्मथस्वामी मंदिर दिपोत्सवामुळे उजळून निघाले. दरम्यान या सर्व कार्यक्रमास महाराष्ट्र व कर्नाटकातील वीरशैव समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी सप्ताह मंडळातील सर्व पदाधिकारी व शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर उपस्थित होते.



# संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त ऐतिहासिक चांभारगडास पर्यटन क दर्जा द्या ; गडाचे विकास काम सुरू करा


■ **अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त मौजे चांभारखिंड येथील ऐतिहासिक चांभारगडास पर्यटन क दर्जा द्या देवून तात्काळ गडाचे विकास काम सुरू करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत समाजवादी पार्टी चर्मकार सभेच्या वतीने मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी देण्यात आले आहे अशी माहिती प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी दिली आहे.

समाजवादी पार्टी चर्मकार सभेच्या वतीने मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी नमूद केले आहे की, मौजे चांभारखिंड, ता.महाड (जि.रायगड) येथील ऐतिहासिक चांभारगडावर दि.२० फेब्रुवारी २०२७ रोजी संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची ६५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. या पवित्र स्थळाचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा जतन करण्यासाठी पुढील मागण्यां तात्काळ मंजूर करण्यात याव्यात. प्रमुख मागण्यां अशा, १) चांभारगडास पर्यटन क वर्ग दर्जा तात्काळ जाहीर करावा., २) गडावरील पायऱ्यांच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामास (ज्याचे इस्टिमेट जि.प. अलिबाग कडे प्रलंबित आहे) तात्काळ प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी द्यावी.

# स्व.सुवालालजी वाकेकर स्मृती प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

## २० सप्टेंबर रोजी शानदार सोहळ्यात होणार पुरस्काराचे वितरण


विश्वास पाटील


भरत गित्ते


डॉ.कविता गित्ते


अंजली कुलकर्णी


शशिकला फुंदे



मनिषा सरवदे


प्रियतमा कराड


प्राजक्ता खानापूरे


संदिपान फड


श्रीकांत बोबडे


श्रीहरी केंद्रे


मिलिंद साळवे


निवृत्ती यवले


सय्यद आमेर


शंकर मामीलवाड

## जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, भुमिपूत्र भरत गित्ते व आदर्श शिक्षकांचा होणार गौरव

**परळी वैजनाथ, (प्रतिनिधी)**

स्व.सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त प्रतिवर्षी प्रमाणे देण्यात येणारे आदर्श शिक्षक, साहित्य गौरव व सेवागौरव पुरस्कार जाहीर झाले असून यंदा या पुरस्कारासाठी १३ मान्यवरांची निवड करण्यात आली असल्याची माहिती स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व साहित्य परिषदेच्या परळी शाखेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

गेल्या १५ वर्षापासून साहित्य परिषदेच्या वतीने परळी परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, साहित्य आदी क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणार्या शिक्षकांचा व इतर मान्यवरांचा साहित्य परिषदेच्या वतीने गौरव केला जातो.

यावर्षी स्व.सुवालालजी वाकेकर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा साहित्य गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांना जाहीर झाला आहे तर याच पुरस्काराने उद्योग क्षेत्रात ज्यांनी परळीचे नाव सातासमुद्रापार नेले, असे परळीचे भुमिपुत्र भरत गित्ते यांना उद्योगरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणार्या आदर्श शिक्षक पुरस्काराचीही यावेळी घोषणा करण्यात आली असून यासाठी निवडण्यात आलेले शिक्षक व त्यांच्या शाळा पुढीलप्रमाणे- अंजली वसंतराव कुलकर्णी (कै.दे.बा.गणगे योगेश्वरी नुतन प्रा.शाळा, अंबाजोगाई), शशिकला नरसोबा फुंदे (रत्नेश्वर विद्यालय,टोकवाडी), मनिषा गुलाबराव सरवदे (पी.एम.श्री.जि.प.केंद्रीय प्रा.शाळा सिरसाळा), प्रियतमा विष्णू कराड (जि.प.प्रा.शाळा, टोकवाडी), प्राजक्ता चंद्रशेखर खानापुरे (नविन प्राथमिक शाळा, थर्मल परळी), संदिपान रामभाऊ फड (सोमेश्वर विद्यालय, जिरेवाडी), श्रीकांत जनार्दन बोबडे (प्राथमिक आश्रमशाळा, वंसतनगर), श्रीहरी बाबुराव केंद्रे (आदर्श विद्यालय,मांडवा), मिलिंद राणोजी साळवे (शारदा विद्यामंदिर, परळी), निवृत्ती नामदेव यवले (संत धुराबाई आदर्श प्रा.शाळा, परळी), सय्यद आमेर सय्यद जमील (जि.प.उर्दु प्रा.शाळा, सिरसाळा) यांची निवड करण्यात आली आहे. यंदाच्या स्व.सुवालालजी वाकेकर सेवागौरव पुरस्कारासाठी नुकतेच जि.प.प्रा.शाळा, सारडगाव येथून सेवानिवृत्त झालेले मुख्याध्यापक शंकर जयवंतराव मामीलवाड यांची निवड करण्यात आली आहे. तसेच केज येथील साने गुरुजी निवासी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.कविता गित्ते यांना शासनाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल यांचाही या कार्यक्रमात गौरव करण्यात येणार आहे.शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. या पुरस्कारांचे वितरण येत्या रविवार दि.२० सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार असल्याची माहिती साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांच्यासह कार्याध्यक्ष अनंत मुंडे, उपाध्यक्ष अरुण पवार, कोषाध्यक्ष प्रा.संजय अघाव, सहसचिव दिवाकर जोशी, प्रा.अर्चना चव्हाण, संपर्क प्रमुख बालाजी कांबळे, प्रसिद्धी प्रमुख सिध्देश्वर इंगोले व त्यांच्या सहकार्यांनी दिली.

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार

**५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि समाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.**

बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक्-श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्त्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्याच्या मनातील भीती ओळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा समतोल राखणे आवश्यक आहे.

या बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला मदत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.

शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व




मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये असलेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. 'हे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला 'कमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.

या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.

आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.

पर्यावरणीय संकटे, पाण्याची समस्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.

शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि मूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या


**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

यशाबरोबर समाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.

शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.

शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हातात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शुक्रवार, 5 सप्टेंबर 2026



# देशपातळीवरील प्रशासनातील कोहिनूर हिरा IAS किरण गीते साहेब!



**(आज दि.05 सप्टेंबर 2025 रोजी मा.किरण गित्ते साहेबांचा वाढदिवस. त्या निमित्त त्यांच्या कार्य कर्तुत्वावर टाकलेला संक्षिप्त प्रकाश )**

**स्वाभिमानाने आणि स्वाभिमान आणि समाजाला कसे जगता येईल यासाठी अनेक राष्ट्र पुरुषांनी प्रयत्न केले. कर्मवीर भाऊराव पाटलांसारख्या शिक्षण तज्ञांनी शिक्षण कार्याला सूर्याचे तेच दिले. अशा या पवित्र शिक्षण क्षेत्रात प्रचंड रस रुची आणि आवड असलेल्या माननीय किरण गित्ते साहेब IAS साहेबांनी केवळ शिक्षण नव्हे तर सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, कुटुंब कल्याण , उद्योग, वाणिज्य ,माहीती तंत्रज्ञान विभाग आणि विविध क्षेत्रात आयएएस या पदावर अत्यंत मौलिक कार्य केले.**

**सर्वप्रथम आपल्या प्रशासकीय सेवेला प्रारंभ केला तो त्रिपुरा राज्यातुन.तीथे त्यांनी अनेक पदावर कार्य केले.ज्यात जिल्हाधिकारी पदाचा ही समावेश होतो.आपल्या पहिल्याच प्रशासकीय पर्वात त्यांनी पायाभूत सूविधा उपलब्ध करून दिल्या.आरोग्य सूविधांमध्ये प्रचंड बदल घडविले.राज्याला औद्योगिक दृष्टिने समृद्ध करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. जे निर्णय घेतले ते लोकाभिमुख होते.त्यामुळेच त्यांची ओळख एक सक्षम व कर्तृत्ववान अधिकारी तीथे ओळख झाली आहे. त्रिपुरा राज्यात 'प्रधानमंत्री जन धन योजना'यशस्वीपणे राबविल्यामुळे त्यांचा सन्मान देशाचे लाडके पंतप्रधान मा.ना. नरेंद्रदजी मोदी साहेब यांच्या हस्ते झाला.**

अमरावती जिल्हाधिकारी , पुणे महानगर आयुक्त पी.एम.आर.डी ए.पुणे पदांवर काम केले मेट्रो उभारणीत महत्वपूर्ण योगदान दिले.तिथे ही आपल्या कामाचा 'गित्ते पॅटर्न'निर्माण केला.त्यांच्या अमरावती येथे केलेल्या उत्कृष्ट कार्यामुळे आज ही प्रशंसा होते.प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी ई-गव्हर्नन्सचे आदर्श मॉडेल उभे केले. याच अमरावती जिल्ह्यात जलयूक्त शिवार ही योजना प्रभावीपणे राबविल्यामुळे त्यांना महाराष्ट्र शासनाकडून 'सर्वोत्कृष्ट जिल्हाधिकारी 'या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नंतर त्रिपुरा राज्यात नगर विकास ,सार्वजनिक बांधकाम, उद्योग, कुटुंब कल्याण , वाणिज्य,पर्यटन, माहिती तंत्रज्ञान सह विविध विभागाचे सचिव म्हणून उत्कृष्ट कार्य केले व करताहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेवुन 'स्वच्छ भारत अभियान 'अंतर्गत संपुर्ण देशातुन त्रिपुरा राज्याने प्रथम क्रमांक मिळविल्याबध्दल व 'शहरी आवास योजना यशस्विपणे राबविल्या बध्दल त्यांचा सत्कार देशाच्या महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

त्रिपुरा राज्यात सार्वजनिक बांधकाम , उद्योग, कुटुंब कल्याण , वाणिज्य,माहीती तंत्रज्ञान विभाग आणि सूशासन या सारख्या अनेक विभागांची धुरा त्यांनी सक्षमपणे सांभाळत आहेत.त्रिपुरा इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉरमेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ही ते राज्याच्या विकासाचे नवे धोरण व रूपरेषा आखत आहेत.त्यांच्यामुळे त्रीपुरा राज्यात गुंतवणुक वाढली असून उद्योगांना गती मिळाली आहे.रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. निवडूकीची जबाबदारी ही सक्षमपणे पार पाडली आहे.

लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे अत्यंत विश्वासू दिनकरराव मुंडे गुरुजी यांचे ते जावई आहेत. त्यांच्यामुळे व स्वतः गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या सहवासात आल्यामुळे त्यांनी साहेबांचा 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही,'हा मंत्र डोळ्यासमोर ठेवून कार्य करताना दिसतात.बीड जिल्ह्याचा एक सुपुत्र आपल्या कार्यकर्तृत्वाने आपले नाव त्रिपुरा राज्यात करतोय याचा खरोखरच सर्वांना अभिमान आहे.साहेब एवढ्या मोठ्या पदावर असले तरी वारकरी संप्रदायाचा सहवास असल्यामुळे 'अहंकाराचा वारा' त्यांच्या अंगाला लागलेला दिसत नाही.' व्हावे लहानाहुणी लहाण' या संतोक्तिप्रमाणे जिथे जशी माणसे भेटतील तसा नम्र भाव ठेवून ते जीवन जगताना दिसतात.देशात परळीचे नाव बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग म्हणून व संत जगमित्र नागा या संतामुळे प्रसिद्धीस आहे.पुढे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी या नगरीचे नाव संयुक्त राष्ट्रसंघापर्यंत नेऊन पोहोचवले.आज मा.किरण गित्ते साहेबांच्या माध्यमातून हे नाव देशभर होताना आपण पाहतो आहोत.

अलीकडे मा.किरण गित्ते साहेब, विवेकानंद यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ उषाताई किरण गित्ते या कर्तुत्वान व्यक्तित्वामुळे शैक्षणिक क्षेत्रात व प्रशासकीय क्षेत्रातही या जिल्ह्याचे नाव होताना दिसते आहे.

परळीला शैक्षणिक वातावरण म्हणावे तेवढे नव्हते.ते निर्माण करण्याचे काम अलीकडच्या काळात मा.किरण गित्ते साहेब (IAS ) व त्यांच्या सौभाग्यवती मा. सौ.उषाताई किरण गित्ते मॅडम यांच्या माध्यमातून विवेकानंद यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अंतर्गत किरण गित्ते आय. ए. एस अकॅडमी,दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल ,पोद्दार जम्बो किड्स, डी डब्ल्यू पी एस वंडरलैंड . किरण गित्ते अकॅडमी' स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली परळीत कार्य करत आहे.

## परळी वैजनाथ च्या भूमिपुत्राचे पंतप्रधानांकडून कौतुक

## त्रिपुरा राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव; विविध क्षेत्रात कर्तृत्व.. महाराष्ट्राला अभिमान!

**माननीय किरण गित्ते साहेब हे त्रिपुरा सरकारमधील मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून कार्यरत आहेत ईशान्य भारतात प्रशासकीय कौशल्याची गुंतवणूक त्यांच्या माध्यमातून होत आहे त्रिपुराचे मुख्यमंत्री डॉ. माणिक सहा यांच्यासह केंद्रीय मंत्रालयातील अनेक मंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या परिषदेमध्ये किरण गित्ते साहेबांनी अत्यंत मौलिक आणि अभ्यास पूर्ण मतं आणि संकल्पना मांडल्या यावेळी बाराशेहून अधिक उद्योजक यावेळी सहभागी होते.**

**आरोग्य : त्रिपुरा राज्याचे मुख्यमंत्री माननीय डॉ. माणिक सहा साहेब यांच्या सहाय्याने माननीय किरण गित्ते साहेब यांनी त्रिपुरा राज्यांमध्ये आरोग्य सुविधांसाठी चार मेडिकल कॉलेजची स्थापना करण्यात आली आहे.**

**किरण गित्ते साहेबांचा जन्मदिवस.**
**साहेबांना निरोगी आनंदी यशात आहे दीर्घ आयुष्य लाभो यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!**

**त्रिपुरा राज्यामध्ये उद्योग क्षेत्रामध्ये त्यांनी केलेली गुंतवणूक लक्षणीय राहिली आहे देश-विदेशातील अनेक उद्योजकांची मांदियाळी ही गित्ते साहेबांच्या कुशल नियोजनाची परिमिती आहे उद्योग क्षेत्राला त्यांनी मोठी भरारी आणि उभारी आणली एक लाख एकवीस हजार तीनशे तीन कोटी रुपये या क्षेत्रातील त्यांची मोठी यश प्राप्ती आहे. एवढेच नाही तर त्रिपुरा सुंदरी माता मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी फार मोठे कार्य केले त्रिपुरा राज्याचे मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून त्यांची कारकीर्द आणि जबाबदारी आणि विशेष म्हणजे सामाजिक बांधकाम उद्योग , आरोग्य,कुटुंब कल्याण, पर्यटन ,वाणिज्य माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव म्हणून त्यांनी केलेले कार्य देशपातळीवर गाजत आहे.**

**बालासाहेब फड,** संपादक, दै.सोमेश्वर साथी,परळी (वै.)

---

# पत्रकारीतेसह सामाजिक कार्याची दखल घेऊन चंद्रकांत कातळे यांचा शिवरत्न पुरस्काराने गौरव

**लातूर** | लोकनेते स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कातळे यांच्या पत्रकारितेसह सामाजिक कार्याची दखल घेऊन लातूर मिशन व शिवदर्शन फाउंडेशन लातूरच्या वतीने शिवरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी लातूर मिशन वृत्तपत्र आणि शिवदर्शन फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पंढरपूर येथील भागवताचार्य हभप श्री त्र्यंबक महाराज आंबुलगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमास लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, जिप गटनेत्या आशाताई भिसे, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष अँड परीक्षित पवार, विभागीय माहिती उपसंचालक सुनील कच्छवे संपादक अशोक हनवते यांची प्रमुख उपस्थित होती.

1987 पासून पत्रकार म्हणून जिद्दीने आणि चिकाटीने पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणारे चंद्रकांत कातळे यांनी रेणापूर तालुका पत्रकार संघाची स्थापना करून तालुका स्तरावरील पहिले पत्रकार भवन उभा करणे, पत्रकाराच्या अडीअडचणी सोडवून त्यांना न्याय देणे, मध्य रेल्वेच्या सल्लागार समिती, जिल्हास्तरीय दक्षता समिती, तालुका संजय गांधी निराधार योजना समिती यासह विविध समितीवर केलेल्या उत्कृष्ट कार्याची त्याचबरोबर सामाजिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन त्यांना शिवरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील दहा कर्तबगार व्यक्तींना शिवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार प्राप्त सर्वांच्या कार्याचे कौतुक करून मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक भारत जाधव यांनी केले तर शेवटी गणेश स्वामी यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर पत्रकार मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार चंद्रकांत कातळे यांना शिवरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

---

# शिक्षणाच्या धंद्यातील नैतिकतेची पातळी आणि विद्यार्थ्यांचे भविष्य

**(राष्ट्रीय शिक्षक दिन विशेष – ५ सप्टेंबर २०२६)**

म्हणायला तर सर्वजण शिक्षणाच्या ज्ञानमंदिराकडे पवित्र व्यवसाय म्हणून पाहतात; परंतु आज व्यापारीकरणाच्या युगात हे तेच ज्ञानमंदिर राहिले आहे का, जिथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची ज्ञानज्योत प्रज्वलित करण्यासाठी विपरीत विचारसरणी आणि रूढी-परंपरा असलेल्या संपूर्ण समाजाकडून घृणा व द्वेष सहन केला होता? महात्मा ज्योतिराव फुले यांनी सामाजिक बहिष्कार, अपमान आणि विरोधाची पर्वा न करता शिक्षणाला वंचितांच्या मुक्तीचे माध्यम बनवले; राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणातील सामाजिक न्याय आणि संधीची समानता ही राज्याची जबाबदारी मानली; महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री-शिक्षणाला आपल्या जीवनाचे ध्येय बनवले; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तन आणि मुक्तीचा आधारस्तंभ मानले; पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयांना ज्ञानापर्यंत समान पोहोच आणि बौद्धिक लोकशाहीचे माध्यम बनवले आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी ज्ञानाकडे विकसित आणि आत्मनिर्भर भारताची शक्ती म्हणून पाहिले. अशा सर्व महापुरुषांच्या आणि समाजसुधारकांच्या दृष्टीने शिक्षण ही विक्रीयोग्य वस्तू नव्हती, तर व्यक्ती आणि समाजाला अधिक चांगले बनविणारी सार्वजनिक नैतिक जबाबदारी होती.

आज त्याच व्यवस्थेसमोर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा आहे—शिक्षण हळूहळू ज्ञान आणि सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयापासून दूर जाऊन शुल्क, नफा, ब्रँड, परीक्षेचे निकाल आणि रोजगाराच्या



**डॉ. प्रितम भि. गेडाम,**
**(महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)**

बाजारपेठेत बदलत चालले आहे का? जर शिक्षणाच्या नावाखाली अनावश्यक आर्थिक भार, नियुक्त्यांमध्ये कथित पैशांचा प्रभाव, राजकीय अथवा प्रशासकीय हस्तक्षेप आणि शिक्षकांची असुरक्षितता यांसारख्या प्रवृत्ती वाढत असतील, तर संकट केवळ संस्थात्मक व्यवस्थेचे नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत नैतिक चारित्र्याचे आहे. अशा परिस्थितीत आपण पुन्हा विचार करणे आवश्यक आहे की, ज्या महापुरुषांनी शिक्षणाला समानता, स्वाभिमान, ज्ञान आणि सामाजिक मुक्तीचे साधन बनवले होते, त्याच वारशाला आपण पुढे नेत आहोत का, की नकळत शिक्षणाला अशा व्यवस्थेत रूपांतरित करत आहोत, जिथे विद्यार्थी ग्राहक, शिक्षक एक कर्मचारी आणि ज्ञान एक उत्पादन बनत चालले आहे?

आजकाल सोशल मीडिया आणि बातम्यांमध्ये शिक्षण संस्थांच्या अनेक अनुचित वर्तनाच्या वाढत्या बातम्या मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होत असून, त्यामुळे शिक्षणाची पवित्रता कलंकित होत आहे. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित महाविद्यालयांमध्ये पदभरतीच्या नावाखाली प्राध्यापकांच्या दराची चर्चा सर्वांना माहीत आहे. काही दिवस वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येतात आणि त्यानंतर पुन्हा सर्व काही सामान्य होते. शिक्षकांचे मानसिक छळ आणि आत्महत्येच्या घटनाही सातत्याने वाढल्या आहेत. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, भरती घोटाळे, पदव्या खरेदी करणे, परीक्षेचे पेपर फुटणे, उत्तरपत्रिकांमध्ये फेरफार, सरकारी खर्चातील अनियमितता, साहित्याच्या खरेदी-विक्रीतील गैरप्रकार आणि कमकुवत आर्थिक उत्तरदायित्व या सर्व बाबी दर्शवतात की शिक्षणाच्या कामकाजात अनेक स्तरांवर गैरप्रकार होऊ शकतात. प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असलेल्या साधारणपणे सर्वच कर्मचाऱ्यांना त्यांच्या विभागात कुठे अनुचित किंवा भ्रष्ट कामे होतात, याची माहिती असते; परंतु बहुतेक जण याबाबत विरोध करणे पसंत करत नाहीत. "जसे चालले आहे तसे चालू द्या," असा दृष्टिकोन ते स्वीकारतात; परंतु या दृष्टिकोनाचा थेट परिणाम संपूर्ण व्यवस्था, समाज आणि देशावर होतो, ज्याचे गंभीर परिणाम निरपराध जनतेला शतकानुशतके भोगावे लागू शकतात.

विकसित देशांमधील शिक्षण संस्था समान गुणवत्तेवर केंद्रित असतात, जिथे श्रीमंत-गरीब आणि खासगी-सरकारी कर्मचाऱ्यांची मुले कोणत्याही भेदभावाशिवाय एकाच शाळेत शिकतात. ज्या देशाने गुणवत्तापूर्ण प्रगत शिक्षण, सुदृढ आरोग्य सुविधा आणि रोजगारनिर्मितीला महत्त्व दिले, तेच देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जाऊन विकसित झाले आहेत. जगात असे अनेक छोटे-छोटे देश आहेत, ज्यांच्याकडे शेतीसाठी जमीन नाही, पुरेशी जलसुविधा नाही किंवा ते नैसर्गिक आपत्तींनी वेढलेले आहेत; तरीही त्यांनी आपल्या चांगल्या शिक्षण प्रणालीद्वारे आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या बळावर विकास साधला. मनुष्याच्या संपूर्ण जीवनाची आधारशिला त्याच्या शिक्षणावर अवलंबून असते. शिक्षणाची गुणवत्ता आणि कौशल्येच त्याच्या भविष्याची दिशा ठरवतात.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)